# सी के टी चे विद्यार्थी जिल्हास्तरीय फ्री स्टाइल कुस्ती स्पर्धेत झळकले

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड अलिबाग व पनवेल महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धा 2025-26 आयोजित केली होती.सदर स्पर्धा नावडे पनवेल येथे 19 सप्टेंबर या कालावधीत पनवेल महानगर पालिका क्रीडा संकुल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती . या स्पर्धेत सी के टी चे १४ वर्षाखालील 1) करण केशव चौहान याने 56 किलो वजनी गटात रजत पदक पटकावले 2) मोहित गणेश पाटील 35 किलो वजनी गटात कांस्य पदक पटकावले 3)देवेंद्र भालचंद्र बैदु 44 किलो वजनी गटात कांस्य पदक पटकावले 4)विराज रमेश रावरिया 49 किलो वजनी गटात कांस्य पदक पटकावले.स्पर्धेच्या पुढील स्तरासाठी या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

सदर विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक आणि शिक्षक यांनी कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत
जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड अलिबाग व पनवेल महानगरपालिका
यांचे सयुंक्त विद्यामाने
कुस्ती स्पर्धा २०२५-२६
१४/१७/१९ वर्ष मुले व मुली
मंगेश
प्रशासक पनवेल